# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
# पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

दिनांक 07/10/2023 (शनिवार) सायंकाळ

---

## मोटरसायकल चोरी

पो.स्टे. एमआयडीसी बोरी :– अंतर्गत टाकळघाट, ता. हिंगणा, जि. नागपूर येथे दिनांक ०५/१०/२०२३ चे ०७.०० वा. ते १२.०० वा. दरम्यान फिर्यादी नामे– तुषार विजयराव झाडे, वय २४ वर्ष, रा. टाकळघाट, ता. हिंगणा, जि. नागपूर हा आपली स्प्लेंडर प्लस मोटरसायकल क्र. एम. एच–३१/सी. डब्लू– ४२३३ किंमती अंदाजे १०,०००/– रू. ही डयुटीवरून घरी रात्री १२.०० वा. आला व घराचे समोरील रोडवर मोटरसायकलला लॉक लावून रूमवर झोपण्याकरीता गेला दुसऱ्या दिवशी सकाळी १२.०० वा. झोपेतून उठून पाहीले असता यातील फिर्यादीला त्याची स्लेंडर प्लस मोटरसायकल किंमती १०,०००/– रू ही ठेवलेल्या ठिकाणी दिसून आली नाही. कोणीतरी अज्ञात आरोपीने चोरून नेली आहे.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्टवरून पो.स्टे. एमआयडीसी बोरी येथे अज्ञात आरोपीविरुध्द कलम ३७९ भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीचा शोध घेणे सुरू असून गुन्हयाचा पुढील तपास पोहवा/३७७ पांडे, पो.स्टे. एमआयडीसी बोरी हे करीत आहे.

पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर